## रे.दि.मु.नं.२३६/२०१५ मधील निशाणी क्र.४६ खालील आदेश

प्रस्तुत अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ०६, नियम १७ नुसार दाव्यामध्ये दुरुस्तीसाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन की, प्रतिवादी क्र.४ मोतीलाल रसुल आतार हा दि. ०५/०८/२०१८ रोजी मयत झालेला आहे. सदर प्रतिवादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी नि.४३ येथे अर्ज देण्यात आला होता. तो अर्ज मंजुर झाल्यानंतर त्याप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करीत असताना नजरचुकीने मयत प्रतिवादी क्र .४ चे ठिकाणी प्रतिवादी क्र.३ असे लिहुन दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सदरची चूक ही तांत्रीक स्वरुपाची आहे. तरी नि. ४१ व ४३ वरील झालेल्या आदेशाप्रमाणे दुरुस्तीमध्ये (३) यास काट मारुन त्याऐवजी (४) लिहीण्यास परवानगी मिळावी. तसेच प्रतिवादी क्र.३ चे नावाखाली लिहीलेले ३-अ, ३-ब, ३-क यास काट मारुन प्रतिवादी क्र.४ चे खाली प्रतिवादी क्र. ४-अ, ४-ब व ४-क असे लिहीण्यास परवानगी मिळणेविषयी विनंती केली आहे

३. प्रतिवादी तर्फे सदर अर्जास म्हणणे देण्यात आले आहे. प्रतिवादींचे कथन की, वादीचा अर्ज खोटा व लबाडीचा असल्याने अर्ज नामंजुर करणेविषयी विनंती केली आहे.

४. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळणेसाठी, पृथ्थक कब्जा मिळण्यासाठी व निरंतरची ताकीद मिळणेकामी दाखल केला आहे. वादीच्या कथनानुसार

दाव्यामध्ये दुरुस्ती करीत असताना नजरचुकीने मयत प्रतिवादी क्र .४ चे ठिकाणी प्रतिवादी क्र.३ असे लिहुन दुरुस्ती करण्यात आलेली आहे. सदरची चूक ही तांत्रीक स्वरुपाची आहे. त्यामुळे दाव्याच्या मूळ विषयातील आशयामध्ये बदल होणार नाही. प्रतिवादी क्र.(३) यास काट मारुन त्याऐवजी (४) लिहीण्यास व प्रतिवादी क्र.३ चे नावाखाली लिहीलेले ३-अ, ३-ब, ३-क यास काट मारुन प्रतिवादी क्र.४ चे खाली प्रतिवादी क्र. ४-अ, ४-ब व ४-क असे लिहीणेस परवानगी मिळावी असे कथन केले आहे. सदर अर्जाचे पुष्टयर्थ प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजुर होणेविषयी विनंती केली आहे. वादी व प्रतिवादी यांच्या दरम्यान निश्चितपणे वाद संपुष्टात येणेकरीता सदरची दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच सदर दुरुस्ती मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्यामुळे वादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. करीता मी खालील आदेश देत आहे.-

## आदेश

१. वादीचा नि.४६ वरील अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. वादीने अर्जात नमुद केलेप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करुन दाव्याची दुरुस्त प्रत १४ दिवसाचे आत न्यायालयात दाखल करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
PRASHANTKUMAR ASHOK PATIL
Digitally signed by PRASHANTKUMAR ASHOK PATIL
Date: 2022.02.16 11:12:31 +0530
सत्यमेव जयते

(पी.ए.पाटील)

दिनांक-१५/०२/२०२२

दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,सांगोला.

***CERTIFICATE***

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment/order:-

a) Name of the Stenographer : S. P. Parekar

b) Court : Civil Judge Jr. Division & J. M. F. C, Sangola.

c) Judgment/Order signed by PO on : 15/02/2022

d) Judgment/Order uploaded on : 15/02/2022